मानसिक आरोग्य जनजागृतीची 'मनतरंग' वाट आता पुण्यातही

डॉ. आनंद नाडकर्णी यांनी घडवली कार्यकर्त्यांची नवी फळी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : समाजाला मानसिक आरोग्याविषयी साक्षर करण्यासाठी ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी चित्रपट या प्रभावी माध्यमाची निवड करून २००६ मध्ये ठाण्यात 'मनतरंग' या अनोख्या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. वाढता प्रतिसाद पाहून नाशिकनंतर पुण्यातही 'मनतरंग फिल्म क्लब' सुरू होत आहे. विशेष म्हणजे हा प्रयास डॉ. नाडकर्णी यांच्या प्रत्यक्ष सहभागाविना पूढे सरकत असला, तरी मानसिक आरोग्य जनजागृतीच्या या वाटा त्यांच्या विचारांनी आणि त्यांनी तयार केलेल्या कार्यकत्यांच्या सक्षम फळीमुळे पुढेही तितक्याच प्रकाशमान राहणार आहेत.

ठाण्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यामध्ये गेल्या महिन्यात २६ एप्रिल रोजी चित्रपट दिग्दर्शक सुनील सुकथनकर यांनी 'मनतरंग' कार्यशाळेत चार तासांचे सत्र घेतले . वास्तविक १६ आणि १७ एप्रिल रोजी ही कार्यशाळा नियोजित होती. यामध्ये स्वतः डॉ. आनंद नाडकर्णी मार्गदर्शन करणार होते. मात्र प्रकृतीच्या कारणास्तव ही कार्यशाळा रद्द करण्यात आली. या उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक सिनेमा किंवा दोन लघुपट दाखवण्यात येणार असून, यामध्ये या चित्रपटांच्या माध्यमातून आपल्या भावना, विचार ,आपल्या समोरची आव्हाने, मानसिकतेच्या विविध छटा हे सगळे मनाचे पैलू उलगडून दाखवण्याचे काम आणि याविषयीची जागरुकता निर्माण करण्याचे काम 'मनतरंग फिल्म क्लब'च्या माध्यमातून होत आहे. यामध्ये मनोविकार तज्ञ, मानसशास्त्रज्ञांसह अनेक तज्ज्ञ सहभागी होणार असून, विविध पैलूंवर चर्चा होणार आहे. सिनेमाची केवळ तांत्रिक बाजूच नाही, तर मानसिक विश्लेषण करून करण्यात येणार आहे

ठाण्यापाठोपाठ नाशिक मध्ये स्वतः डॉ. नाडकर्णी यांनी पुढाकार घेऊन 'मनतरंग' हा उपक्रम सुरू केला. याला सहा वर्षे झाली असून, आता पुण्यातही हा उपक्रम सुरू होत आहे. डॉ. नाडकर्णी यांनी 'मनतरंग फिल्म क्लब' सुरू केल्यानंतर समाजाच्या अनेक स्तरांतून याविषयी विचारणा होऊ लागली. याचा चांगला परिणाम विविध घटकांवर होत असल्याने ठाणे, नाशिक आणि पुण्यापाठोपाठ आता लवकरच सोलापूर आणि मुंबईमध्येही 'मनतरंग' हा उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

'मनतरंग' भविष्यात सोलापूर आणि मुंबईमध्ये ही सुरू होणार असून, याव्यतिरिक्त 'आयपीएच'मध्ये असे अनेक उपक्रम चालू आहेत, की जिथे डॉ. नाडकर्णी यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीची गरज पडत नव्हती. त्यांनी आम्हा कार्यकर्त्यांची पुढची फळी तयार केली असल्याने त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून मार्गक्रमण करणे हेच आता ध्येय असणार आहे.

– शैलेश मेदगे, इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थ सॅस्थेचे व्यवस्थापक ठाणे

'मनतरंग' चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन आमच्या 'देवराई' या चित्रपटाने झाले होते. मानसिक आरोग्य जोपासण्यासाठी हव– श्राव्य माध्यमांची समजूतदार जाणीव विकसित व्हायला हवी, असे डॉ. नाडकर्णी यांचे आग्रही म्हणणे होते. यातूनच 'पुणे आयपीएच'तर्फे कार्यशाळा किंवा फिल्म–क्लबसारखे सातत्यपूर्ण उपक्रम करण्याची त्यांची इच्छा होती. आम्ही एकत्रपणे असा कार्यक्रम ठरवलाही होता. त्यांच्या आजारपणामुळे मी तो वेगळ्या स्वरूपात एकट्याने केला. डॉ. आनंदना आपण अचानक गमावून बसलो आहोत. त्यांची पोकळी कशी भरून निघणार ? पण त्यांची जीवनदृष्टी पुढे नेणारे हे उपक्रम 'पुणे आयपीएच'ने ताकदीने पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

– सुनील सुकथनकर, चित्रपट दिग्दर्शक

पुण्यात ३० मे रोजी दोन लघुपट दाखविणार

पुण्यामध्ये ३० मे रोजी 'आयपीएच'मधील जाणेतत्व दोन लघुपट दाखवण्यात येणार आहेत. यंदा 'मुलांचे भावविश्व' हा विषय असून, यामध्ये 'द सायलेंट वाइल्ड' या चित्रपटाद्वारे संवादाशी आसुसलेल्या एका चिमुकलीची संघर्षकथा, तर सिंग या लघुपटाद्वारे निरागस मैत्री आणि श्रष्ट व्यवस्थेशी विवेकी लढा या दोन लघुपटांचा मनोवैज्ञानिक दृष्टीने रसास्वाद घेण्यात येणार आहे.

ऊर्जा, पाणी बचतीसाठी राज्य मंडळाचा पुढाकार

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) आता ऊर्जा बचतीसाठी पुढाकार घेतला आहे. राज्य मंडळाची विभागीय कार्यालये, तसेच मुख्य कार्यालयाला आता सौरऊर्जेचे बळ देण्यात येणार आहे. तसेच ऊर्जा बचतीसाठीची उपकरणे, पाणी बचतीची यंत्रणाही बसवण्यात येणार आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी ही माहिती दिली. राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांसह मुख्य कार्यालयाचे हरित ऊर्जेच्या दृष्टीने सर्वेक्षण करून अंदाजपत्रक तयार करण्यात आले. तांत्रिक मान्यता प्रक्रिया पूर्ण करून जिल्हा नियोजन विकास समितीकडे (डीपीसीडी) निधी मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. येत्या ३१ डिसेंबरपर्यंत सर्व इमारतींवर सौरऊर्जा पॅनेल बसवण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

तसेच मंडळातील ९५ टक्क्यांपेक्षा जास्त उपकरणे मोठ्या प्रमाणात ऊर्जा वापरतात. त्यामुळे ऊर्जा बचत करणारी उपकरणेही बसवण्यात येणार आहेत. हे काम ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिएन्सी (बीईई) आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा) या संस्थांच्या माध्यमातून केले जाणार आहे. त्या अंतर्गत ऊर्जा बचत करणाऱ्या उपकरणांवर ४८ लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. त्याशिवाय, पाणी बचतीसाठीचेही नियोजन करण्यात येत असल्याची माहिती डॉ. कुलकर्णी यांनी दिली.

हवामानात होत असलेले बदल गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शक्य ते प्रयत्नही केले पाहिजेत. त्यामुळे ऊर्जा बचत, हरित ऊर्जा यासाठीची कामे करण्यात येणार आहेत. या कामांवर राज्य मंडळाचा निधी खर्च न करता सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून ही कामे करण्यात येणार आहेत, असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

मुलींच्या परीक्षा शुल्कासाठी योजना

राज्य मंडळाच्या दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी आर्थिक परिस्थिती नाही म्हणून विद्यार्थिनीना अडचण निर्माण होऊ नये यासाठी राज्य मंडळाकडून योजना सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यानुसार विद्यार्थिनींचे शुल्क सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून भरण्यात येईल. त्यासाठी काही कंपन्यांना काही जिल्हे, तालुके दत्तक घेण्याची विनंती केली जाईल. राज्य शासनाची मान्यता घेऊन या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी नमूद केले.

वृद्धापकाळात ताळमेळ राखावा

डॉ. उल्हास लुकतुके यांचे प्रतिपादन

पुणे : 'वृद्धापकाळात बुद्धी, स्मृती आणि वर्तनाची दिशा यांचा योग्य ताळमेळ राखला, तर डिमेन्शिया आजारापासून वाचता येते. तसेच, उतारवयात मी पणा गर्व आणि आग्रह सोडा, जे वाट्याला आले आहे, त्याचा निमूट स्वीकार करावला शिका, तरच या टप्प्यावरही तुम्ही आनंदाने आयुष्य व्यतीत कराल,' असे प्रतिपादन डॉ. उल्हास लुकतुके यांनी एका कार्यक्रमात केले,

'सिल्व्हर इनिंग्ज' आणि 'प्राजक्त प्रकाशन' यांच्या वतीने शैलेश मिश्रा लिखित 'रिमेंबर मी, यु मी ॲंड डिमेन्शिया' या पुस्तकाचा मराठी अनुवाद प्रशांत तळणीकर यांनी केला असून, या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. उल्हास लुकतुके आणि वृद्धरोगतज्ज्ञ डॉ. संदीप तामणे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

डॉ. संदीप तामणे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांना अनेक आजार असतात. या सगळ्यांचे आकलन करून घेणे आणि त्यावर यशस्वी मात करणे, हे खरोखर खूप मोठे आव्हान आहे. डिमेन्शिया म्हणजे काहीही करता येणार नाही, हा गैरसमज आहे. जर सुरुवातीलाच याचे निदान झाले, तर तो पूर्ण बरा होऊ शकतो. अशा पुस्तकाच्या माध्यमातून समाजात या विषयी जाणीव असणे गरजेचे आहे.'

या पुस्तकाच्या माध्यमातून हाच प्रयत्न केला असल्याचे लेखक प्रशांत तळणीकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

शिक्षकांची प्रतिनियुक्ती संपुष्टात

मूळ नेमणुकीच्या जागी रुजू होण्याचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : निवडणुकीसह विविध प्रकारच्या शासकीय कामांसाठी प्रतिनियुक्ती झालेल्या शिक्षकांना आता त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी परत जावे लागणार आहे. शिक्षक मूळ जागी रुजू न झाल्यास संबंधितांचे मे पासूनचे वेतन न देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत संयुक्त परिपत्रकाद्वारे विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची निवडणूक आणि अन्य कामांसाठी प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकांबाबत क्षेत्रिय कार्यालयांनी सादर केलेल्या माहितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. त्यानंतर ९ मे रोजी झालेल्या बैठकीत निवडणूक आणि अन्य कामावर प्रतिनियुक्त असलेल्या सर्व शिक्षकांना त्यांचे मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित शिक्षकांना त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तत्काळ कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करावी. सादर केलेल्या माहिती व्यतिरिक्त शिक्षकांची प्रतिनियुक्ती शासकीय कार्यालयात असल्यास त्या कार्यालय प्रमुखांशी संपर्क करून त्यांनाही कार्यमुक्त करण्याचे निर्देश द्यावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

कार्यमुक्त केल्याचे आदेशानंतरही शिक्षक त्यांच्या मूळ जागी रुजू न झाल्यास त्या शिक्षकांचे माहे मे महिन्याचे वेतन दिले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच त्याबाबत वेतन अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी पथक यांनाही आदेश द्यावेत. त्याशिवाय निवडणूक व अन्य कामांसाठी प्रतिनियुक्तीने कार्यरत स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक, मूळ नेमणुकीच्या जागी रूजू झालेल्या शिक्षकांचा एकत्रित अहवाल ३१ मेपर्यंत सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याही आहेत.

केनरा बैंक Canara Bank
A Central Government Undertaking
BOBCAPS
Transforming Lives, Transforming Business
(A wholly owned subsidiary of Bank of Baroda)

ADVERTISEMENT INVITING EXPRESSION OF INTEREST ("EOI") FOR TRANSFER OF STRESSED LOAN EXPOSURE IN THE ACCOUNT OF M/S SHRINATH COTFAB ("SNCF") TO PERMITTED TRANSFEREES THROUGH AN OPEN AUCTION PROCESS FOLLOWED BY THE SWISS CHALLENGE METHOD

BOB Capital Markets Limited ("BOBCAPS" / "Process Advisor"), acting in its capacity as Process Advisor on behalf of Canara Bank ("CB" / "Bank" / "Lender"), hereby invites Expression of Interest ("**EOI**") from eligible ARCs, Banks, NBFCs, AIFIs, and other Permitted Transferees", collectively, "**Permitted Transferees**" or "**Bidders**"), as defined under and eligible in accordance with applicable laws, including but not limited to the RBI (Commercial Banks – Transfer and Distribution of Credit Risk) Directions, 2025, as amended from time to time ("**RBI Directions**"), and the Bank's internal Board approved policy.
Nature of Transaction: The Lender proposes to sell/transfer the Stressed Loan Exposure of SNCF, having aggregate fund-based outstanding limits of **INR 58,61,43,523.07 (Rupees Fifty-Eight Crores Sixty-One Lakhs Forty-Three Thousand Five Hundred Twenty-Three And Paisa Seven Only)** and non-fund based limit of **INR 42,00,000.00 (Rupees Forty-Two lakhs only)** as on **30.04.2026**, plus further interest and charges etc., to eligible Permitted Transferees, on an "**All Cash**" basis, with **a minimum Reserve Price of INR 20.75 crore (Rupees Twenty Crores Seventy Five Lakhs only)**, strictly on "**as is where is**", "**as is what is**", "**as is how is**", "**whatever there is**" and "**without recourse**" basis, through an Open Auction Process followed by the Swiss Challenge Method ("**SCM**"), as set out in the Bid Process Document ("**BPD**"). The Lender shall not assume any operational, legal, financial, or any other risk or liability in relation to the Stressed Loan Exposure and shall not provide any representations, warranties, or assurances in respect of the SNCF.
Submission of EOI: Eligible Permitted Transferees desirous of participating in the process are required to submit their EOI & Other Documents (i) **Electronically**, by email to: cb5208@canarabank.com & project.delta@bobcaps.in; and (ii) **Physically**, by delivering duly executed and stamped original documents to: Mr. Sagar Bhadra - Assistant Vice President, BOB Capital Markets Limited, B-1704, Parinee Crescenzo, G Block, BKC, Bandra (East), Mumbai 400051. **Last Date for Submission of EOI & Other Documents is May 20, 2026.**
Bid Process Document: The BPD is available for download on the official websites of BOBCAPS (www.bobcaps.in/tenders) and Canara Bank at (www.canarabank.bank.in).
Interested Permitted Transferees may contact the following representatives for any queries/clarifications:

Contact Person	Tel. No.	Email-ID
Mr. Sagar Bhadra, AVP – BOBCAPS	+91 7666412395	project.delta@bobcaps.in
Mr. Hemant Gupta, SM – BOBCAPS	+91 9819436276	
Mr. Shriram V, AGM - CB	+91 6364905153	cb5208@canarabank.com
Mr. Vijay Haribabu Shinde, SM – CB	+91 7353372266	

Important Disclaimers: (1) This is a two-stage process: Stage I involves a physical bidding process to identify the Anchor Bidder; Stage II involves an e-Auction under the SCM to determine the Successful Bidder, subject to final approval by the competent authority of the Lender. (2) The Lender/BOBCAPS reserve the right to suspend, withdraw, cancel, modify, or extend the process or any part thereof, at any time, without assigning any reason and without liability, by uploading a corrigendum on the aforementioned websites. (3) Bidders are solely responsible for keeping themselves apprised of any updates or corrigenda published on the aforementioned websites. (4) The decision of the Bank shall be final, conclusive, and binding on all Bidders. (5) This advertisement is not an offer document and is issued without any commitment or obligation on the part of the Lender/BOBCAPS.
Place : Mumbai Sd/-
Date : May 16, 2026 Issued By, Canara Bank, ARM Branch, Pune

जनगणना 2027 आपला देश आपला विकास
गृह मंत्रालय भारत सरकार सत्यमेव जयते

आपली जनगणना
आपला विकास

घरांची यादी व
गृहनिर्माण जनगणना
१६ मे ते १४ जून

तुम्हास काय विचारले जाईल ?

CBC 19108/13/0094/2627

घराची माहिती :
- बिल्डिंग नंबर
- जमीन, भिंती व छताची सामग्री
- घराचा निश्चित वापर - (निवासी/ अनिवासी)
- घराची स्थिती

अन्य :
- वापरले जाणारे मुख्य अन्नधान्य
- मोबाईल नंबर (केवळ जनगणना माहिती प्रसारणकरिता)

कुटुंबाबद्दल मूलभूत माहिती :
- कुटुंब सदस्यांची संख्या
- कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग व जात (एससी/ एसटी किंवा अन्य)
- घराचा मालकी दर्जा
- खोल्यांची संख्या
- घरात राहणाऱ्या विवाहित जोडप्यांची संख्या

सुविधा :
- पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत
- पिण्याच्या पाण्याची उपलब्धता
- प्रकाश योजनेचा मुख्य स्त्रोत
- सौचालयाची उपलब्धता
- सौचालयाचा प्रकार
- सांडपाणी बाहेर सोडणारा मार्ग
- स्नानगृह सुविधा
- स्वयंपाकघर व एलपीजी / पीएनजी कन्नेक्शन
- स्वयंपाकाकरिता वापरले जाणारे मुख्य इंधन

मत्ता :
- रेडिओ/ ट्रान्झीस्टर
- टेलिव्हिजन
- इंटरनेट सुविधा - कॉम्प्युटर/ लॅपटॉप
- मोबाईल फोन/ टेलिफोन
- दोन-चाकी/ चार चाकी वाहन

» ही पायरी लोकसंख्या गणनेचा पाया रचते
» तुमची सर्व माहिती पूर्णतः गोपनीय व सुरक्षित राहील
टोल-फ्री-१८५५

चला तर आपली जबाबदारी पार पाडूया आणि जनगणनेत सहभागी होवूया
CensusIndia2027